# BHARATI VIDYAPEETH UNIVERSITY, PUNE (INDIA)

## Reaccredited with 'A' Grade by NAAC



# BU - MAT 2016

# ALL INDIA ENTRANCE EXAM

# INFORMATION BROCHURE

# Vision



"To emerge as a value centred leading educational institute in the field Management, Information Technology & Social Sciences"

# Mission

"Social Transformation through Dynamic Education"

# Goals

- To provide affordable and high quality education to students in management and computer application fields.
- To inculcate human values in management education and research for enabling our graduates to effectively lead society in the emerging border-less world.
- To bring about healthy synergy between the worlds of business and industry, on the one hand, and those of pedagogy and research, on the other.
- To benchmark against the best and continuously improve in all spheres and at all times.
- To create a learning environment, while helping students to add value in all fields of business activity.

# Programme Offered

The institute offers following programmes.

| Sr. No. | Programme | Duration | Semesters | Intake Capacity |
|---|---|---|---|---|
| 1. | MBA | Two Years | Four | 60 |
| 2. | MCA | Three Years | Six | 30 |
| 3. | MCA | Two Years (Lateral Entry) | Four | 20% of Intake |
| 4. | MCA (Integrated) | Five Years | Ten | 30 |
| 5. | BBA | Three Years | Six | 60 |
| 6. | BCA | Three Years | Six | 60 |

# Salient Features

- Re-accreditation with **‘A’** Grade by NAAC
- Approved All India Council of Technical Education (AICTE), New Delhi
- ISO 9001:2008 Certification by British Standard Institutions (BSI)
- Ph.D. Centre in Management
- AKIMSS Journal of Research in Management, Computer Applications & Social Sciences (ISSN No.: 2319 – 2348)
- Life Member of Association of Indian Management Schools (AIMS)
- State of Art Infrastructure
- Wi – Fi Campus
- Qualified and dedicated faculties
- The Corporate Resource Center
- Excellent inputs for overall development of professional competencies and personality of the students.
- Placement Assistance Cell (Centralized Placement Cell at Pune)
- Well equipped library with more than 22,060 books and 48 national and international research journals
- The facility of Online Research Journals (IEEE, J-Gate, EBSCO), DELNET facility, Book-Bank facility, more than 500 Management CD’s, Night Reading Room Facility.
- Video-conferencing, Excellent Internet Laboratory, Computer Laboratory
- Language Lab
- Sport Facility (Indoor and outdoor)
- NSS Wing, TWG, Co-curricular and Extracurricular Activity
- In-house banking facility
- Alumni Association

# About Solapur City

Solapur city, famous for its Chadder , Handloom, Powerloom and Beedi Industries, covering an area of 14844.6 sq.kms., it is one of the important districts in Maharashtra State of India.



It is situated at a distance of 410 Kms. from the Maharashtra State Capital of Mumbai by road and train. It falls on the Mumbai-Chennai and Mumbai-Hyderabad railway track.



The nearest domestic Air-Port is Pune and the international Air-Port is Mumbai. Solapur is at a distance of 245 kms. from Pune, 305 Kms. from Hyderabad (Andhra Pradesh). The national highways viz. NH-9, NH-13 and NH-211 pass through the city making Solapur on the frontline of the commercial map of India.



The city is having 11 Talukas and is surrounded by Ahmednagar and Osmanabad districts in the north, Osmanabad and Gulbarga (Karnataka State) in the East, Sangli and Bijapur (Karnataka State) in the South and Pune, Satara districts in the West.

Shrikshetra Pandharpur, considered as 'Southern Kashi' of India and Kuldaivat of Maharashtra State is the honour of this district.

# About the Institute



**Dr. V. S. Mangnale**
**Director, AKIMSS, Solapur**

Abhijit Kadam Institute of Management and Social Sciences is a premier leading institute in Western Maharashtra located in Solapur. The institute is approved by AICTE, recognized by UGC and is under the umbrella of Bharati Vidyapeeth University, Pune. It has a well-established history and prides itself for its academic reputation. Having been set up in 1981, AKIMSS has emerged as a citadel of learning and research with a symbiotic relationship with the worlds of business and industry.

We create an environment within which actionable learning takes place and thus provide the breeding ground for managerial leadership of the future.



We presently offer post graduate programmes MBA, MCA, Integrated MCA and under graduate programmes BBA, BCA.

The institute has excellent full time faculty with a proven track record and a slew of visiting faculty who bring the experience of the real world into the classroom. Specialist scholars come and deliver lectures enabling the student to expand their horizons of *gyan* (knowledge), *buddhi* (intelligence) and *vivek* (the consciousness to discern). The result is that our student is so good that his/her placement takes place with minimal effort.

# Infrastructure

The campus of the institute is located in twin city area of Solapur spread over in 2.82 acres of land. The institute has well equipped and furnished Class-Rooms, Seminar-Hall, Conference-Hall, Computer Labs, Library, Boys & Girls Common Room, HOD cabin, Faculty-Cabin & Administrative Office.

# Classrooms



The classrooms and comfort meets state of the art equipment in our ergonomically designed classrooms. Modern teaching aids like LCD & OHP projects and structured sitting arrangements makes the classroom learning more interactive.

# Seminar Hall

The seminar hall is well equipped with modern aids like audio-video aids, LCD arrangement, Backup power arrangement that enables the student and the staff for effective learning.

The institute conducts special seminars for career development and counselling.



# Library

The institution has augmented the Infrastructure to keep pace with academic growth. It has an up-to-date library with facilities like Open Access System, Book Bank Scheme, Easy Lib and SOUL; it has an Internet lab and a Server with a Firewall built in to prevent virus through internet access from creeping into the system.




**Open access facility** is available for the students through which students are allowed to enter into the area where the books are kept. The students can see the availability of books inside the library and accordingly allowed to issue the books at home.

The magazines and journals are kept in the display board & content of journal send to faculty members. The students can directly pick up them and read it in the reading room.




There is a separate **Reference Book Section** in which the students and the staff members sit in the reference room section. Recent books, CDs and periodicals are added every year. The faculty is provided with internal facility through LAN.

The institute is having a **Research Cell** under which the faculties write the papers and get it published in National and International journals. Each of the faculty members has presented their Research Papers in National Seminars or conferences. We have undertaken socially significant research projects, in the thrust area of research being marketing, business development, IT and HRM.

| | | |
|---|---|---|
| Books | : | 22,060 |
| International Journals | : | 24 |
| National Journals | : | 24 |
| E-Resources | : | 04 |
| CD/DVDs | : | 500 |
| Back Volumes of Journals | : | 468 |

# Technology Centres



The Institute houses specious class rooms, conference and seminar halls. The Institute has a special skill lab for developing the managerial skills of the students. All the rooms and halls are aptly ventilated and lighted.

The students have provided with audio visual aids for learning like LCDs, OHP and audio systems. The students have a special dress code including blazers.

There is a special internet lab where students can access to Internet. An Internet lab has set up in C-S Environment with a Firewall built in to prevent virus through internet access from creeping into the system.



The institute has a well versed computer lab where students are acquainted with the Information System today. There are three computer labs each have capacity of each 40 computers.

All these computers are in LAN and have a well powered backup. The Information System Centre is professionally managed and equipped.

All the computers have protected by Quick Heal Console Unit. Each lab is under CCTV surveillance.

# Guest Faculty




The institute invites personalities with special backgrounds to give additional inputs to the students. The experts conduct the sessions which contains subjects like, HR practices, Retailing, Advertising, Share Market issues, Consumer behaviour etc.,




This is held every Saturday, where in the experts from the corporate world are invited from various fields to conduct interactive sessions and to encourage open exchange of experiences and views.

# Industrial Training, Visits









The institute organizes the Induction Progamme every year. For the induction programme the eminent personalities called from industry. The induction programme covered the various activities essential for the academic development.

The induction programme highlights the various important aspects about academic curriculum and enhancements.

The institute invites special personalities from various industries. The institute conducts various activities under the personality development forum. It will helpful to the students in their overall development of skills and abilities. The experts from the industries guide our students in their skill enhancements.

The experts highlight the concepts of subjects and their applicability in practical real life. The institute conducts on site practical exposures to the students by organizing industrial visits.Based on currents trends, technologies and management concepts, the guests' highlights those aspects to the students.

The institute trying to develop a readymade managers to approach to an organization through running such industry support activities.

# Events & Activities

Mid-term seminar, Annual seminar, Class Room Seminars, Workshops and Conferences are the common features of our academic programmes.









The students are given many opportunities to express their organizing skills and communication skills in such programs.

Experts from the field are invited as resource persons to share their knowledge and expertise with student community.

Case study method and Group Discussions are widely used techniques by our faculty members to develop the analytical abilities, presentation skills and leadership skills in the students.

Intensive field-work and projects are undertaken by the students to know the current behavioral pattern in the business world and the society outside.

# Events & Activities




The institute has encouraged its students to participate in extracurricular activities including sports and games. The institute organizes various extracurricular activities and invites the student's participation.

Every year the events like Intercollegiate Cultural Competitions are organized. The Institute has organized Lakshya event in which the various competitions such as Role Plays, Musical Skit Plays, Dramas, and Extempore were organized.




The Institute has well equipped facilities for conducting the different games in the premises. The Institute organises Sports events every year through which Interclass competitions in Cricket, Volley Ball, Football, Table Tennis, Chess, Carrom.



Our Institute has NSS wing with 50 NSS volunteers. Under this AKIMSS organises various social activity throughout the year and every year AKIMSS conducts Special Winter Camp.

Our institute has organized a special programme for girls named "Disha". In this programme, various issues about girls were discussed and what kind of precautions need to be taken based on the situation.

# Student Awards



The institute allows the students to participate in extra-curricular activities organized by other institutes located in nearby area or state. The MBA students have won the first prize in quiz completion held at Solapur. Students were participated in various intercollegiate competitions. The students of MBA, BBA participated in Electro exhibition. The students have given the practical exposure toward implementation of Management skills.



Bharati Vidyapeeth University, Pune granted permission to start NSS unit from the academic year 2012-2013. University sanctioned for the 50 strength of volunteers for our unit. For the academic year 2014-2015 we enrolled 50 volunteers. After the enrolment of 50 volunteers, the NSS activities were conducted for them as per the schedule prepared for academic year 2014-2015. We conducted various activities in the institute with the NSS volunteers.

We are happy to mention that, this year our NSS unit won first prize of "**State Level Inter University Road Safety Awareness Competition**" with a cash prize of worth Rs. 2 Laks, promoted by Maharashtra State Highway Police and Maharashtra State Ministry of Higher and Technical Education. The award of Rs. Two Lakhs and Trophy received at the hands of Hon'ble Shri. Devendra Fadnavis Chief Minister, Maharashtra.

# Alumni Association Activity




Our Institute have an alumni association named SWAA. The valuable suggestions are taken from the alumni who have studied the curriculum.

These suggestions are given by the alumni depending on their experiences while applying their bookish knowledge in the real work environment.

These suggestions are valuable and hence are the BOS faculty members while designing the new curriculum. These feedbacks are taken in the form of suggestions whenever the alumni visit the institute.

# Our Proud Recruiters

**BVU AKIMSS** has its own placement cell coordinated by students under the guidance of coordinator through which the students are assisted for being placed in reputed companies. The institute's students are working in renowned companies.

| | | | |
|---|---|---|---|
| 7tech Solutions | Syntel | Aircel | Balaji Amines |
| Devamigo | Siemens | Ashwath | ING Vyaas |
| Wipro Technologies | Avanti Group | ilimitech | HB Entertainment |
| Proficient | AFTEK | Videocon | ICICI |
| HCL Technologies | Zenith Systems | IBM | CMC Microsystems |
| Sunrise Technologies | Satyam | RanBaxy | Intellisoft technologies |
| Sutra Systems | Brila Group of Industries | HDFC Bank | MetLife |
| AirTel | Karrox | Gati | Mahindra |
| Reliance Fresh | New York Max | INSIGNIA | |
| Cognizant Technology Solutions | | Lokmangal Group of Industries | |

# Media Coverage



## भारती विद्यापीठाच्या 'ट्रॅडिशनल डे'मध्ये भारतीय संस्कृतीचा जागर

### युवक-युवतींनी लुटली मजा

भारती विद्यापीठाच्या अभिजित कदम इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट ॲन्ड सोशल सायन्सेसचा ट्रॅडिशनल डे एकदम हटके आणि जल्लोषपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी युवक-युवतींनी भारताच्या प्रत्येक प्रांतातील वेषभूषा परिधान करून आनंदोत्सव साजरा केला. तसेच भारतीय संस्कृतीचा जागर केला, त्याविषयी 'संचार-कॉलेज कॅम्पस'ने जाणून घेतलेला हा विशेष वेध...

सध्या प्रत्येक कॉलेज कॅम्पसमध्ये टेन्शन फ्री वातावरण दिसून येत आहे. कारण परीक्षांना प्रारंभ होण्यास आणखीन वेळ आहे त्यामुळे इंजिनिअरिंगबरोबरच पारंपरिक महाविद्यालयांमध्येही ट्रॅडिशनल डे बरोबरच विविध डे आणि 'फेस्ट'चा गलबलाट दिसून येत आहे. यामुळे कॅम्पस उत्साहाबरोबरच मौज-मस्तीने बहरलेले आहे. अशीचप्रकारे भारती विद्यापीठाचा 'ट्रॅडिशनल डे' एकदम जल्लोषपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी युवक-युवतींनी भारताच्या प्रत्येक प्रांतातील वेशभूषा परिधान करून त्याविषयी सर्वांना सविस्तर माहिती दिली. तसेच भारतीय संस्कृतीचा जागर केला.

यावेळी युवतींनी महाराष्ट्रीय अस्सल मराठमोळी साडी परिधान करून तसेच मानाचा 'फेटा' बांधून जल्लोष साजरा केला. तसेच 'बंजारा' पोषाख परिधान केलेली कांचन राठोड ही ट्रॅडिशनल डे मध्ये 'लक्ष' वेधून घेत होती.

यावेळी तिने सर्वांना बंजारा पोशाखाचे महत्त्व सांगून त्याविषयी सविस्तर माहिती दिली.

**वेगळाच उत्साह**

भारत हा विविधतेने नटलेला देश असून येथे संस्कृतीला असाधारण महत्त्व आहे. यासाठीच आम्ही ट्रॅडिशनल डे सेलिब्रेट करून भारतीय संस्कृतीचा जागर केला. एक वेगळाच उत्साह यामुळे कॅम्पसमध्ये संचारला होता.

अजय हक्के

**मजा आली**

'ट्रॅडिशनल डे'च्या निमित्ताने मी बंजारा पोषाख परिधान करून त्याविषयी सर्वांना माहिती देऊन त्यांचे महत्त्व विशद केले. एकूणच यामुळे खूप मजा आली. एक वेगळे वातावरण कॅम्पसमध्ये बहरले होते. 'कॉलेज लाइफ'चा अनोखा आनंद यामुळे लुटता आला.

कांचन राठोड



बाजार बज

## एसव्हीआयटीमध्ये मराठी राजभाषा दिन

सोलापूर

एसव्हीआयटीमध्ये मराठी राजभाषा दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. मंगनाळे व प्रा. अकबर नदाफ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील मराठी दिग्गजांचे पोस्टर्स लावण्यात आले होते. प्रा. मोहन देशपांडे यांनी कुसुमाग्रजांची कविता ओळखलात का सर मला सादर करून विद्यार्थ्यांनी मराठी भाषेचा आदर करण्याविषयी शपथ दिली. कार्यक्रमासाठी प्रा. असिफ शेख, प्रा. इलाई तांबोळी, प्रा. स्वाती पाटील यांनी परिश्रम घेतले.

# अभिजित कदम इन्स्टिट्यूटचा राज्य पातळीवर गौरव

**● रस्ता सुरक्षा अभियान सोलापूर प्रथम ● राज्याचा २ लाख रु. चा पुरस्कार**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते रस्ता सुरक्षा अभियान प्रथम क्रमांकाचा पुरस्कार स्विकारताना व्ही. एन. मंगनाळे, प्रा. व्ही. एन. मोरे.

सोलापूर (नगर प्रतिनिधी) - राज्य रस्ता सुरक्षा अभियान स्पर्धेत सोलापूरच्या अभिजित कदम इन्स्टिट्यूटने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला असल्याची माहिती संचालक डॉ. व्ही. एस. मंगनाळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

भारतीय विद्यापीठा अंतर्गत अभिजित कदम इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट अॅण्ड सोशल सायन्सेस सोलापूरला राज्य रस्ता सुरक्षा अभियानात मानाचा प्रथम क्रमांक पटकावला आहे. राज्याच्या एकूण ३००० महाविद्यालयांमधून सोलापूर इन्स्टिट्युटची निवड करण्यात आली आहे.

या प्रथम क्रमांकासाठी त्यांना २ लाख रुपये रोख, आकर्षक चषक व प्रशस्ती पत्रक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नागपूर येथे देण्यात आला. संस्थेतर्फे पुरस्कार डॉ. व्ही. एस. मंगनाळे, रसियो कार्यक्रम अधिकारी प्रा. व्ही. एन. मोरे व रसियो स्वयंसेवक यांनी स्वीकारला या प्रसंगी मंचावर राज्याचे उर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे, नागपूरचे पोलिस आयुक्त के. के. पाठक, अप्पर पोलिस महासंचालक सुरेंद्र पांडे, आ. डी. मिलिंद माने, पोलिस अधिकारी व अन्य विद्यापीठ कुलगुरु उपस्थित होते.

पत्रकार परिषदेस प्रा. व्ही. एन. मोरे, जेकब मुनशीकर, अजहर टंगसाळ, प्रा. प्रीतम कोठारी, अजय नंदूरकर, अखिलेश भूषण उपस्थित होते.

## उल्लेखनीय उपक्रम

शहरात बऱ्याच ठिकाणी 'इमारती हद्द' नि 'फूटपाथ' यातील मोकळ्या जागी नागरिक कचरा टाकून वातावरण प्रदूषित करतात. त्याचबरोबर कुत्री, डुकरे धुडगूस घालून तो कचरा परत रस्त्यावर आणतात. याबाबत जुळे सोलापूर येथील भारतीय विद्यापीठ या संस्थेने हितकारी उप्रकम राबवला आहे. संस्थेच्या कर्मचाऱ्यांनी या मोकळ्या जागेत हिरवळ नि फुलझाडे लावून त्यांची सतत निगा राखली आहे. त्याचप्रमाणे संस्थेसमोरील रस्ता दुभाजकातील विविध रोपेही जलसिंचन करून हिरवीगार केली आहेत. या कृतीचे सर्वांनी अवलोकन केल्यास सोलापूरवासीयांचे सुंदर सोलापूरचे स्वप्न साकार होईल.

**- प्रा. मधुकर देवळालकर** सोलापूर.

# सीएसआय : अध्यक्षपदी डॉ. नदाफ

## बुधवारी पदग्रहण, सचिवपदी डॉ. कारंडे

प्रतिनिधी | सोलापूर

कॉम्प्युटर सोसायटी ऑफ इंडियाच्या सोलापूर शाखा अध्यक्षपदी डॉ. अकबर नदाफ तर सचिवपदी डॉ. विक्रम कारंडे यांची निवड झाली. पदग्रहण समारंभ बुधवारी (दि. २९) सकाळी साडेदहा वाजता भारती विद्यापीठ संकुलात होईल. डॉ. नदाफ हे भारती विद्यापीठ एमसीए विभागप्रमुख आहेत. तर डॉ. कारंडे हे ऑर्किड अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रथम वर्ष अभियांत्रिकीचे मुख्य समन्वयक आहेत. इतर पदाधिकारी असे : उपाध्यक्ष हेमंत कुलकर्णी, खजिनदार संदीप देसाई. सदस्य उपप्राचार्य व्ही. व्ही. पोतदार, प्रा. एस. टी. जगताप, उद्योजक अभिजित शिंदे, शाम येमूल, श्रीशैल लातुरे, अॅड. बसवराज सलगर, अक्षय जव्हेरी, नॉमिनेटिंग समिती सभासद डॉ. बी. शिवशंकर, इंजिनिअर राजेंद्र गांधी, प्राचार्य मोहन देशपांडे.



पदग्रहण समारंभात सिंहगड इंजिनिअरिंग कॉलेजचे प्राचार्य डॉ. शंकर नवले प्रमुख पाहुणे असतील. अध्यक्षस्थानी भारती विद्यापीठाचे संचालक व्ही. एस. मंगनाळे असतील. कॉम्प्युटर सोसायटी ऑफ इंडिया ही भारतातील आयटी निगडित सर्व प्रोफेशनल्सची संस्था १९६५ पासून कार्यरत आहे.

## भारती विद्यापीठात ट्रॅडिशनल डे साजरा



भारती विद्यापीठ अभिजित कदम इन्स्टिट्यूटमध्ये आयोजित ट्रॅडिशनल डेनिमित्त आयोजित कार्यक्रमात सहभागी विद्यार्थी-विद्यार्थिनी.

सोलापूर : भारती विद्यापीठाच्या अभिजित कदम इन्स्टिट्यूटमध्ये ट्रॅडिशनल डे साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी या कार्यक्रमास स्पर्धेचे स्वरुप देण्यात आले होते. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांना पारंपरिक वेशभूषा देण्यात आल्या. बीसीए फस्टच्या विद्यार्थ्यांनी पहिले तर सेकंडच्या विद्यार्थ्यांनी दुसरे बक्षीस पटकावले. यावेळी संचालक डॉ. एस. बी. सावंत आदी उपस्थित होते. (प्रतिनिधी)

**राष्ट्रीय परिषद** | भारती विद्यापीठमध्ये ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयावर मार्गदर्शन

# डिजिटलायझेशनच्या युगात ग्रंथालये अद्ययावत हवीत

### डिजिटल इन्फर्मेशन रिसर्च सेंटरचे शास्त्रज्ञ डॉ. दहीभाते यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी | सोलापूर

डिजिटलायझेशनच्या युगात ग्रंथालये अद्ययावत हवीत. कारण ग्रंथालयांचे स्वरूप बदलत राहणार आहे, ही आव्हाने पेलण्यासाठी ग्रंथपालही सज्ज हवीत. असे मत पुणे येथील डिजिटल इन्फर्मेशन रिसर्च सेंटरचे शास्त्रज्ञ डॉ. एन. बी. दहीभाते यांनी आज येथे व्यक्त केले.

भारती विद्यापीठांतर्गत अभिजित कदम इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड सोशल सायन्सतर्फे ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयावर राष्ट्रीय परिषद झाली. उद्घाटन डॉ. दहिभाते यांच्या हस्ते झाले, यावेळी ते बोलत होते. प्रारंभी महाविद्यालयाचे संचालक डॉ. व्ही. एस. मंगनाळे यांनी स्वागत केले. ग्रंथपाल सचिन सूर्यवंशी यांनी प्रास्ताविक केले.

या राष्ट्रीय परिषदेला देशभरातून गुजरात, गोवा, कर्नाटक आदी राज्यातून एकूण १७५ ग्रंथपाल व संशोधकांनी सहभाग घेतला. दुपारच्या सत्रात ५५ संशोधकांनी रिसेंट ट्रेंडस इन लायब्ररीज, वेब टेक्नॉलॉजी, कॉपीराईट, इन्फर्मेशन सोर्सेस, बेस्ट प्रॅक्टीस इन लायब्ररीज आदी विषयांवर आपले शोधनिबंध सादर केले. या शोधनिबंधाचे पुस्तकरूपात प्रकाशन करण्यात आले. प्रा. एस. सी. मैंदर्गी यांनी सूत्रसंचालन केले. व्यवस्थापन विभागप्रमुख प्रा. पी. पी. कोठारी यांनी आभार मानले. ग्रंथालय व माहितीशास्त्र यावर आयोजित राष्ट्रीय परिषद यशस्वी होण्यासाठी सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक, विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.



भारती विद्यापीठाच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन करताना डॉ. एन. बी. दहीभाते. यावेळी संचालक डॉ. व्ही.एस. मंगनाळे यांनी स्वागत केले, सचिन सूर्यवंशी, प्रा. पीतम कोठारी आदी.

### ग्रंथपालांनी अपडेट राहावे

परिषदेच्या दुसऱ्या सत्रात नवी दिल्लीच्या असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीचे ग्रंथपाल डॉ. यदुवीर सिंग यांनी 'कॉपीराईट, सोशल मीडिया' या विषयावर मत मांडले. ते म्हणाले, माहिती तंत्रज्ञानाच्या काळानुसार ग्रंथपालांनी अपडेट राहणे गरजेचे आहे. या राष्ट्रीय परिषदेचा फायदा होतो आहे. यातून नव नवे संशोधन, शोधनिबंध सामोरे येते."

**डॉ. यदुवीर सिंग,** ग्रंथपाल

### सोयीसुविधा अद्ययावत हव्यात

बदलत्या काळानुसार ग्रंथालयातील सोयीसुविधा व साधने यांचे स्वरूप बदलत राहणार आहे. सुविधा अद्ययावत ठेवण्यात येण्याची गरज आहे, असे मत गुलबर्गा युनिव्हर्सिटीचे ग्रंथपाल सुरेश झंगे यांनी परिषदेत व्यक्त केले."

**सुरेश झंगे,** ग्रंथपाल, गुलबर्गा युनिव्हर्सिटी



सोलापूर : भारती विद्यापीठात आयोजिलेल्या राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन करताना डॉ. यदूवीरसिंग, डॉ. एन.बी. दहिभाते, डॉ. व्ही. एस. मंगनाळे व अन्य.

# ग्रंथालय व माहितीशास्त्र परिषदेत १७५ संशोधकांचा सहभाग

संचार प्रतिनिधी

सोलापूर, दि. १५- भारती विद्यापीठांतर्गत अभिजित कदम इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड सोशल सायन्सेस तर्फे ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयावरील राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यात १७५ संशोधकांनी सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. एन. बी. दहीभाते (पुणे) यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाचे संचालक डॉ. व्ही. एस. मंगनाळे यांनी स्वागत केले. प्रस्तावना ग्रंथपाल सचिन सूर्यवंशी यांनी केली व परिषदेचा हेतू विशद केला. आपल्या उद्घाटनपर भाषणात डॉ. एन. बी. दहीभाते यांनी डिजिटलायजेशनच्या युगात ग्रंथालये कशी असावीत हे स्पष्ट केले. ग्रंथालयाचे बदलते स्वरूप व त्याबरोबर ग्रंथपालांनी करावयाची तयारी यावर आपले मत विशद केले.

द्वितीय सत्रात वक्ते म्हणून लाभलेले डॉ. यदूवीरसिंग ग्रंथपाल, असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज नवी दिल्ली यांनी कॉपीराईट, सोशल मीडिया या विषयावरती आपले मत मांडले. माहिती तंत्रज्ञानाच्या बदलत्या काळानुसार ग्रंथपालांनी अपडेट राहाणे गरजेचे असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

या परिषदेसाठी लाभलेले दुसरे वक्ते सुरेश झंगे ग्रंथपाल गुलबर्गा युनिव्हर्सिटी यांनी बदलत्या काळानुसार ग्रंथालयामधील सोयीसुविधा व साधने यांचे बदलते स्वरूप स्पष्ट केले. माहिती तंत्रज्ञानाच्या बदलत्या काळात ग्रंथालयाचे असणारे महत्त्व व त्यासाठी लागणाऱ्या सोयीसुविधा ग्रंथालयामध्ये उपलब्ध करून देणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

या राष्ट्रीय परिषदेला देशभरातील गुजरात, गोवा, कर्नाटक, महाराष्ट्र अशा वेगवेगळ्या राज्यातील ग्रंथपाल व संशोधकांनी सहभाग नोंदविला. दुपारच्या सत्रात ५५ संशोधकांनी रिसेंट ट्रेंडस् इन लायब्ररीज, वेब टेक्नॉलॉजी, कॉपीराईट, इन्फर्मेशन सोर्सेस, बेस्ट प्रॅक्टिस इन लायब्ररीज, क्लाऊड कॉम्प्युटींग अशा विविध विषयावर आपले शोधनिबंध सादर केले. हे सर्व शोधनिबंध एकत्रित करून त्याचे पुस्तक स्वरूपात प्रकाशन करण्यात आले. ही परिषद यशस्वी होण्यासाठी प्रकाश राठोड, हिमालया पब्लिकेशन, विकास पब्लिकेशन यांचा हातभार लाभला.

कार्यक्रमाचे संयोजक म्हणून ग्रंथपाल सचिन सूर्यवंशी यांनी संचालक डॉ. व्ही. एस. मंगनाळे यांच्या मार्गदर्शनाखाली काम पाहिले. सूत्रसंचालन प्रा. एस. सी. मैंदर्गी यांनी तर आभार प्रदर्शन व्यवस्थापन विभागप्रमुख प्रा. पी. पी. कोठारी यांनी केले.

# बी क्विझ स्पर्धेत अजय शिवशरण यास सुवर्णपदक



भारती विद्यापीठात आयोजित बी क्विझमध्ये सहभागी विद्यार्थ्यांना सन्मानित करताना संचालक डॉ. व्ही. एस. मंगनाळे. यावेळी नीलेश भागवत, डॉ. ए. बी. नदाफ, प्रा. पी. पी. कोठारी उपस्थित होते.

प्रतिनिधी । सोलापूर

भारती विद्यापीठ अभिजित कदम इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट व बिझनेस स्टँडर्डच्या वतीने आयोजित बी क्विझमध्ये एमबीएमधील अजय शिवशरण याने सुवर्णपदक पटकावले. महाविद्यालयात आयोजित या क्विझमध्ये एमबीए, एमसीए व बीसीए मधील २०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या क्विझमध्ये उद्योग जगताशी निगडित ५० हून अधिक प्रश्न विद्यार्थ्यांना विचारण्यात आले.

अजय शिवशरण (एमबीए प्रथम वर्ष)- प्रथम- सुवर्णपदक, प्राची मनगोळी (बीसीए द्वितीय)- द्वितीय- कास्य पदक तर दिलेशा शेख (बीबीए तृतीय वर्ष)- तृतीय- ब्रांझ पदक विजेते ठरले. बिझनेस स्टँडर्डचे व्यवस्थापक नीलेश भागवत यांच्या उपस्थितीत पारितोषिक देण्यात आले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संचालक डॉ. व्ही. एस. मंगनाळे, एमसीए विभाग प्रमुख डॉ. ए. बी. नदाफ, एमबीए विभाग प्रमुख प्रा. पी. पी. कोठारी यांनी अभिनंदन केले. यशस्वी विद्यार्थी झोनल क्विझसाठी पात्र ठरले आहेत, अशी माहिती देण्यात आली.

# भारती विद्यापीठातर्फे राजूर येथे शिबीर

सोलापूर - भारती विद्यापीठ अभिजित कदम इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट अँड सोशन सायन्सेसच्या राष्ट्रीय सेवा योजना हिवाळी शिबीराचे उद्घाटन माजी दुग्धविकास मंत्री आनंदराव देवकते यांच्या अध्यक्षतेखाली आणि बाबुराव पेठकर यांच्या उपस्थितीत राजूर येथे झाले. व्यवस्थापन आणि संगणक शिक्षणातील अभ्यासक्रमातून ग्रामविकास साधण्यासाठी व्यवस्थापन व संगणक विभागाचे विद्यार्थी सात दिवस येथे हिवाळी शिबीराअंतर्गत विविध उपक्रम राबविणार आहेत. या शिबीरासाठी एकूण २५ शिबीरार्थी सहभागी झाले आहेत. महाविद्यालयाचे संचालक डॉ. एस.बी. सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबीरामध्ये संगणक प्रशिक्षण, आरोग्य तपासणी शिबीर, महिला बचत गट आणि युवक मंडळातील सदस्यांशी चर्चासत्र, स्त्रीसशक्तीकरण, पाणी नियोजन आणि व्यवस्थापन, उच्चशिक्षणाच्या संधी या विषयावर व्याख्याने, ग्रामस्वच्छता, पथनाट्य, सांस्कृतिक कार्यक्रम यासारखे उपक्रम राबविले जाणार असल्याचे प्रा. व्ही.एन. मोरे यांनी सांगितले.

आनंदराव देवकते यावेळी बोलताना म्हणाले की, ग्रामविकासामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष योगदान आहे. महाविद्यालयीन युवक आपल्या ज्ञानाचा उपयोग ग्रामीण समाजातील लोकांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्याचा प्रयत्न करतात. या सर्व शिबीरार्थी विद्यार्थ्यांना सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करून ग्रामविकास साधण्यासाठी एकत्र येऊन काम करावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

बाबुराव पेठकर यांनी शुभेच्छा दिल्या, ग्रामीण समस्या जाणून घेऊन आपल्या ज्ञानाचा उपयोग ग्रामविकासासाठी करावा असे आवाहन केले. यावेळी सरपंच विजयाश्री देवकते, सर्व सेवा सोसायटीचे चेअरमन बिराजदार, सुभाष देवकते, धेटे, डॉ. पी.ए. इराबत्ती यांच्यासह ग्रामस्थ, शिबीरार्थी उपस्थित होते.

दैनिक
दिव्य मराठी
दैनिक भास्कर समूहाचे मराठी वृत्तपत्र
…ni.com सोलापूर शनिवार, ३१ जानेवारी २०१५

**यशाचा कानमंत्र** | अभिजित कदम इन्स्टिट्यूटतर्फे व्याख्यानाचे आयोजन

# युवकांनो, स्वप्ने पाहण्यासाठी आपल्यास हवी कष्टाची झोप!

- डीएसके ग्रुपचे अध्यक्ष डी. एस. कुलकर्णी
- हुतात्मा स्मृती मंदिरात 'स्वप्ने पाहा... प्रत्यक्षात आणा...'वर व्याख्यान





उपस्थितांसाठी प्रेरक व्याख्यान देताना डी. एस. कुलकर्णी. दुसऱ्या छायाचित्रात उपस्थित श्रोते.

प्रतिनिधी | सोलापूर

''परमेश्वराने दोन हात दिले, ते नोकऱ्यांची भीक मागण्यासाठी नाही, तर नोकऱ्या वाटण्यासाठी आहेत. त्यामुळे नोकरी नाही यासाठी नाराज होऊ नका. मिळेल ती कामे करून कष्टाची झोप घ्या. स्वप्ने पाहा, प्रत्यक्षात आणण्याचे प्रयत्न करा, यश हात जोडून तुमच्यासमोर उभे असेल. १९७० मध्ये ५०० रुपयांचे कर्ज घेऊन छोट्या व्यवसायाला सुरुवात केली. आज त्याचा विस्तार ६ हजार कोटींचा झाला. त्यामागे अनेक कष्ट आहेत. पेपरची लाइन टाकली. टेलिफोन पुसून अत्तर लावण्याचे काम केले. दुकानांचे फलक पुसले. काम करताना लाजू नका. प्रामाणिकपणा सोडू नका.''

''सुख कसे मानायचे हे ठरवण्यात आहे. प्रत्येक माणसाला परमेश्वराने दोन कारखाने दिले, एक साखरेचा आणि दुसरा बर्फाचा. तोंडात साखर आणि डोक्यावर बर्फ ठेवून काम केल्यास अनेक प्रश्न सुटतील. नखे, केस वाढले म्हणून कापून टाकतो. राग आला म्हणून काय करतो? गिळून टाकणे हाच उत्तम पर्याय आहे. कुठल्याही व्यवसायात राग चालत नाही. भाषा व भांडवलाचीही गरज नाही. इंग्रजी बोलता येत नाही यासाठी अनेक तरुणांच्या मनात न्यूनगंड असतो. तो काढून टाकला तर प्रत्येक देशात जाऊन उद्योग काढू शकाल.''

## डीएसके उवाच...

१. स्पर्धा नाही, असा एकही व्यवसाय नाही. स्पर्धेतूनच व्यवसायाचा विकास होतो.

२. ग्राहकाच्या खिशात हात घालू नका, त्याच्या हृदयात हात घालण्याचा प्रयत्न हवा.

३. तराजूचा काटा नेहमी ग्राहकाच्या बाजूनेच झुकला पाहिजे. त्याने विश्वास वाढतो.

४. रागावलेला ग्राहक शिव्या देऊन जाईल, काही घेऊन जाणार नाही, हे लक्षात घ्या.

५. संधिसाधू व्हा. संधी टिकटिक केल्यास दार उघडा. परंतु लांडीलबाडी ओळखून.

६. संकटे नेहमी येतात. त्याला घाबरून चालणार नाही, त्यावरून झेप घ्यायला शिका.

## थोबाडीत हाणली अन् शिकलो

''पेपरची लाइन टाकताना पहाटे उठायचो. एकेदिवशी उशीर झाला. मालकाने थोबाडीत लगावली. त्याच दिवशी निश्चय केला. नोकरी करायची नाही. दुसऱ्या दिवसापासून स्वतः पेपर घेऊन टाकण्यास सुरुवात केली. दहावीच्या निकालाचा दिवस होता. सर्वांत आधी पेपर हाती घेण्यासाठी सायकल जोरात मारली. तासात पेपर संपले. माझ्या खिशात ८० रुपयांची चिल्लर झाली. एका बाजूला ओझे झाले म्हणून ४०-४० रुपये करून दोन्ही खिसे भरले. त्यात हात घालून छाती फुगवली. तेव्हापासून मोठी स्वप्ने पाहण्यास सुरुवात झाली.''

''आज अमेरिकेच्या प्रत्येक क्षेत्रात भारतीय आहेत. नासामध्ये १८ टक्के, आयटी क्षेत्रात २८ टक्के. हीच मंडळी अमेरिकेची अर्थव्यवस्था चालवत आहेत. तिथे त्यांच्याकडेच पैसा आहे. कारण, भारतीय म्हणून बचत करण्याची सवय त्यांच्याकडेच आहे. अमेरिकन माणसाच्या हाती पगार आल्याच्या दुसऱ्याच दिवशी पैसे संपून जातात. कारण, पैसे उडवून चंगळवादी जीवन ते जगत असतात. अशा अमेरिकेत २००८ मध्ये जमीन घेतली. घरे बांधली. परंतु घर घेण्यासाठी कोणी येत नव्हता. त्यामुळे धास्ती वाटली, पण माझे काम मी थांबवले नाही. कारण व्यवसायात थांबून चालत नाही. शेवटी एक चीनचा माणूस आला. त्याने आईला पसंत असेल तर घर घेण्याचे आश्वासन दिले. ती चिनीत बोलणारी. पण मी मराठी, हिंदी, इंग्लिश बोलून तिला घर पटवून दिले. तिथे माझ्या भावनेचा विजय झाला. अशी असंख्य उदाहरणे मी देऊ शकेन. ज्यात माझ्या यशाची रहस्ये आहेत.''

भारती विद्यापीठाच्या अभिजित कदम इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड सोशल सायन्सेस आणि माजी विद्यार्थी संघटनेच्या वतीने डीएसके ग्रुपचे अध्यक्ष डी. एस. कुलकर्णी यांचे व्याख्यान आयोजित केले होते. शुक्रवारी सायंकाळी हुतात्मा स्मृती मंदिरात झालेल्या या कार्यक्रमासाठी तरुणांची मोठी गर्दी होती. विद्यापीठाचे संचालक डॉ. व्ही. एस. मंगनाळे यांनी स्वागत केले. किशोर चंडक यांनी परिचय करून दिला. संदीप जव्हेरी यांनी आभार मानले.



# शेअर बाजारातील गुंतवणुकीमुळे आर्थिक विकास : ठाकूर

सोलापूर / प्रतिनिधी

शेअर बाजारात आता अनेक बदत होत आहे. आजच्या संगणकीय युगात शेअर बाजाराबाबत सर्वांनाच माहिती होणे गरजेचे आहे. शेअर बाजारातील गुंतवणुकीमुळे अर्थिक विकास होणार असल्याचे प्रतिपादन अर्थतज्ज्ञ चंद्रशेखर ठाकूर यांनी केले.

भारती विद्यापीठांतर्गत अभिजीत कदम व्यवस्थापन, समाज विज्ञान संस्था आणि लोकमंगल फाऊंडेशन, तसेच सेंट्रल डिपॉजटरी सर्व्हीसेस यांच्या संयुक्त विद्यमाने 'श... शेअरबाजाराचा...' या विषयावर आयोजित व्याख्यानात ठाकूर बोलत होते. यावेळी ठाकूर यांनी शेअर म्हणजे काय, कॅपिटल मार्केट, कॉमोडिटी मार्केट, सेबीचे शेअर मार्केटमधील महत्त्व, ऑनलॉईन ट्रेडींगची पद्धत, डी मॅट अकाऊंट कसे उघडायचे, शेअर मार्केटमधील गुंतवणुकीचे महत्त्व यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना ठाकुर यांनी उत्तरे देऊन शेअर मार्केटविषयी असलेले गैरसमज दूर केले. यावेळी महाविद्यालयाचे संचालक डॉ. व्ही.एस.मंगनाळे यांनी स्वागत केले. व्यवस्थापन विभाग प्रमुख प्रा.पी.पी. कोठारी यांनी कार्यक्रमाचा हेतू विषद केला. आभार प्रा. सुचेता भोगडे यांनी मानले.

# भारती विद्यापीठातर्फे उद्या मुलींसाठी व्याख्यानाचे आयोजन

सोलापूर (प्रतिनिधी)

भारती विद्यापीठाअंतर्गत अभिजीत कदम इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अॅण्ड सोशल सायन्सेस सोलापूर यांच्यातर्फे १ ते १३ जानेवारी या कालावधीत विद्यापीठाचे संस्थापक डॉ. पतंगराव कदम व भारती विद्यापीठाचे कार्यवाह डॉ. विश्वजित कदम यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. याचाच एक भाग म्हणून सोमवार १२ जानेवारी सकाळी १० वाजता महाविद्यालयीन विद्यार्थिनींसाठी दिशा उपक्रमांतर्गत तीन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती डॉ. ए.बी. नदाफ यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यामध्ये व्याख्यानमालेत अॅड. अपर्णा रामतीर्थकर यांचे मुलींसाठी कायद्यातील तरतुदी व शासनातर्फे राबविले जाणारे उपक्रम, डॉ. प्रतिभा पाटील यांचे बदलत्या जीवन शैलीत मुलींच्या नैसर्गिक वाढीवर होणारा परिणाम व आहारातील बदलामुळे उद्‌भवणारे आजार तर स्वाती चव्हाण यांचे सुखी जीवनाचा मूलमंत्र या विषयावर व्याख्यान होणार आहे. विजापूर रोड वरील भारती विद्यापीठाच्या सेमिनार हॉलमध्ये ही व्याख्याने होणार आहेत, असेही डॉ. नदाफ यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस डॉ.प्रीतम कोठारी, प्रा. स्मिता गंभीरे, प्रा. शिवगंगा मैंदर्गी आदी उपस्थित होत्या.

# लोकमत

महाराष्ट्राचा मानबिंदू

सोलापूर, शनिवार, दि. ३१ जानेवारी २०१५






अभिजित कदम इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट आणि माजी विद्यार्थी संघटनेतर्फे शुक्रवारी आयोजित व्याख्यानात बोलताना डीएसके ग्रुपचे अध्यक्ष डी. एस. कुलकर्णी. छायाचित्रात किशोर चंडक, माजी विद्यार्थी संघटनेचे एस. मंगनाळे, महेश बोरोटीकर आदी. दुसऱ्या छायाचित्रात समोर उपस्थित सोलापूरकर श्रोते.

# झऱ्यासारखे प्रवाही राहा, यशस्वी व्हाल !

## डी. एस. कुलकर्णी : भारती विद्यापीठातर्फे व्याख्यान

सोलापूर : आयुष्य हे रानातल्या झऱ्यासारखे असते. झऱ्यासारखेच नागमोडी वळणाचे असते. झरा काटेरी झुडपावरूनही वाहतो. त्याला काटे टोचत नाहीत. झऱ्याला गुदगुल्या होतात. वाहत असताना पुढे दगड, धोंडे येतात, त्यामुळे झरा खळखळ असा सुंदर आवाज काढतो.... नदीच्या प्रवाहात मिसळतो....अथांग सागराला मिळतो. आयुष्यही असेच झऱ्यासारखे प्रवाही ठेवा. प्रामाणिकपणे कष्ट करायची तयारी ठेवा..., यशस्वी व्हाल!..., डीएसके ग्रुपचे चेअरमन डी. एस. कुलकर्णी हे सोलापूरकर तरुणाईला साद घालत होते. त्यांचा हा यशाचा मंत्र युवकांना प्रोत्साहित करत होता.

भारती विद्यापीठाचे अभिजित कदम इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट आणि माजी विद्यार्थी संघटनेतर्फे डी. एस. कुलकर्णी यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. 'स्वप्ने पाहा... प्रत्यक्षात आणा' हा विषय होता. विद्यापीठाचे संचालक डॉ. व्ही. एस. मंगनाळे, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष संदीप जव्हेरी, कार्यवाह महेश बोरोटीकर आदी मंचावर होते.

डी. एस. कुलकर्णी यांनी लहानपणापासून केलेले छोटे - मोठे व्यवसाय आणि त्यातून मिळालेल्या यशाची कहाणी सांगत विषयाची मांडणी केली. ते म्हणाले, पुण्यातील तेल्या - तांबोळ्याची वस्ती असलेल्या कसबा पेठेत राहायचो. वडील पोलीस कॉन्स्टेबल होते; तर आई दुसरी शिकलेली. महापालिकेच्या शाळेत शिकत होतो. शाळा सुटली की, शनिवार वाड्याच्या पटांगणात क्रिकेट खेळायचो. मित्रांच्या घरात छोटे छोटे व्यवसाय होते. कुणी चणे - फुटाणे विकायचे, कुणाचा हॉटेल व्यवसाय, टांगेवाल्याचा मुलगाही मित्र होता. क्रिकेट खेळायला हे सारे मित्र लवकर यावेत म्हणून त्यांच्याबरोबर चणे विकायचो, हॉटेलमध्ये कपबशा धुवायचो, घोड्याला खरारा करायचो. हे सारे करत व्यवसाय करताना ग्राहकांना आकर्षित करण्याचे गुण शिकलो. त्यानंतर वर्तमानपत्राची लाईन टाकायला लागलो. एकदा उशिरा गेल्यानंतर मालकाने थोबाडीत मारली. तेव्हा ठरवले की, नोकरी करायची नाही. दुसऱ्या दिवसापासून स्वत:ची लाईन सुरु केली; पण त्या थोबाडीने मला वक्तशीरपणा शिकविला.

कॉलेजात शिकताना मुलांबरोबर मस्तीही केली. निलंबित व्हावे लागले. 'एफवाय' ला असताना मीराच्या प्रेमात पडलो. तिच्याशी घरात न सांगता लग्न केले. तिच्याबरोबरच टेलीस्मेलचा व्यवसाय सुरू केला. तिथूनच आयुष्याला कलाटणी मिळाली, असे सांगताना कुलकर्णी म्हणाले की, प्रत्येकानेच जीवनाचा आनंद घेतला पाहिजे. सुख हे पैशात नसतं ते मानण्यात असतं. प्रत्येकानेच ध्येयासाठी वेडे होऊन प्रयत्न केले पाहिजेत. संकटाला न घाबरता प्रामाणिकपणे कष्ट केले पाहिजेत, असेही ते म्हणाले.

प्रारंभी डॉ. मंगनाळे यांनी प्रास्ताविक केले. किशोर चंडक यांनी परिचय करून दिला. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. गो. मा. पवार, शिल्पकार भगवान रामपुरे, उद्योजक शिवप्रकाश उर्फ बाबू चव्हाण, केतनभाई शहा यांच्यासह सोलापूरकर युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. (प्रतिनिधी)

### 'डीएस' यांचे प्रेरणादायी बोल

- स्वप्नं पाहायला कष्टाची झोप यावी लागते अन् स्वप्नही असे असावे की, झोपही उडाली पाहिजे.
- जिद्दीने कष्ट करा, यशस्वी व्हाल.
- राग गिळायला शिका. नाते तोडू नका.
- आई, पत्नीचा सल्ला घ्या. भारतीय स्त्री हुशार आहे.
- हल्ली संवाद बंद झाला आहे. शेजाऱ्यांशी संवाद साधा.
- परमेश्वराने प्रत्येकाला बर्फ आणि साखरेचे कारखाने दिले आहेत. त्याचा उपयोग करा.
- प्रत्येक नैराश्येतून तुमची निराशा दूर होईल. नवीन शिकायला मिळेल.
- इंग्रजीचा न्यूनगंड बाळगू नका. इंग्रजी आले नाही म्हणून बिघडत नाही.
- परमेश्वराने दोन हात नोकरीची भीक मागण्यासाठी दिले नाहीत; नोकऱ्या वाटण्यासाठी दिल्या आहेत.

### सोलापूरकर तळपताहेत

- विविधतेमध्ये समृद्धी असते. सोलापुरात मराठी, तेलुगू, कन्नड भाषा बोलणारे लोक नांदतात. येथे विविधता आहे. किर्लोस्करांनी येथे उद्योगाचा पाया रचला. जगभरात कुठेही जा या शहरातील, जिल्ह्यातील दहापैकी पाच माणसे तरी भेटतील. सोलापूरकर खरोखरच तळपत आहेत, असे उद्‌गार डी. एस. कुलकर्णी यांनी काढले. तेव्हा टाळ्यांचा कडकडाट झाला.